**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ७४९२ /२०२३ दिनांक :- १४/१० /२०२३

**विषय :- नवरात्र उत्सव : २०२३ निमीत्त श्री.महालक्ष्मी मंदिर,सारसबाग भागातील वाहतूक व्यवस्थेत करण्यात येणा-या बदला बाबत.**

दिनांक १५/१०/२०२३ रोजीपासून श्री. महालक्ष्मी मंदीर, धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट सारसबाग पुणे तर्फे सार्वजनिक नवरात्र महोत्सव साजरा करण्यात येत असून दिनांक- १६/१०/२०२३ रोजी, सकाळी ०५.०० ते ०७.०० या वेळेत महिलांचे एकत्रित श्रीसुक्त/अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम आयोजीत केला असल्याने सदर कार्यक्रम दरम्यान वाहतुकीची कोंडी होऊ नये, वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दिनांक- १६/१०/२०२३ रोजी, सकाळी ०४.३० ते श्रीसुक्त/अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम संपेपर्यंत श्री. महालक्ष्मी मंदिर, सारसबाग परिसरातील वाहतूकीत तात्पुरत्या स्वरुपात खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

१. जेधे चौकाकडुन येणाऱ्या वाहनांना बाजीरावरोड वरील जमनलाल बजाज पुतळा ते सावरकर चौक या मार्गावर प्रवेश बंद करण्यात येत आहे. त्यांनी जमनालाल बजाज पुतळा येथून पुरम चौकाकडे जावे.
२. मित्रमंडळ चौकाकडून येणारी वाहतुक सावरकर चौकापासून पुरम चौकाकडे जाणेस बंद करण्यात येईल. सदर मार्गावरील वाहनांना सिंहगड रोड जंक्शन चौकाकडे वळविण्यात येईल.
३. सिंहगड रोड मार्गे येणा-या वाहनचालकांना सावरकर चौक येथुन पुरम चौकाकडे प्रवेश बंद राहिल. त्यांनी मित्रमंडळ चौक मार्गे व्होल्गा चौकातून इच्छित ठिकाणी जावे

तरी नागरीकांनी व वाहन चालकांनी वरील नमूद निर्बंध केलेल्या मार्गांवर येण्याचे टाळावे तसेच पर्यायी मार्गांचा वापर करून वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

१४/१०

**( विजयकुमार मगर )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**

Scanned with OKEN Scanner